**<u>नियमित फौजदारी खटला क्र. ७५/२०१९</u>**

**<u>निशाणी ६१</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. १ यांचा जबाब शपथेवर सुरू</u>**

**माझे नांव – राजेंद्र सदाशिव पाटील**

**वय – ४७ वर्षे, व्यवसाय – शेती.**

**रा.** – कामेरी. सध्या– इस्लामपूर, **ता.** वाळवा, **जि.** सांगली.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे श्री एस. बी. जाधव सहा. सरकारी अभियोक्ता यांचेतर्फे</u>**

मी इस्लामपूर येथे माझे आई–वडिल, माझा भाऊ नामे रणजित आणि रणजित यांची पत्नी विजया पाटील यांचेसह रहातो. शेती करत करत मी माझा भाऊ रणजित यास हॉस्पीटलचे कामात मदत करत असतो. रणजित पाटील यांचे 'प्रकृती आयुर्वेदीक चिकित्सालय' या नावाने हॉस्पीटल आहे. सदर हॉस्पीटल रणजित व त्याची पत्नी चालवतात.

२. घटना दिनांक २५/११/२०१८ रोजी संध्याकाळी ७:३० वाजता 'प्रकृती आयुर्वेदीक चिकित्सालय' येथे घडली. घटनेच्या दिवशी मी हॉस्पीटलमध्ये सकाळी ११:०० वाजलेपासून रात्री ८:०० ते ९:०० वाजेपर्यंत होतो. मी दवाखान्यामध्ये औषध देण्यासाठी हजर होतो. माझ्यासोबत दवाखान्यातील कपांऊडर मनोज शिवाजी पाटील हा होता. घटनेच्या दिवशी संध्याकाळी ७:०० ते ७:१५ वाजताचे सुमारास मी, अंजूम मुलाणी व अवधुत शेटे असे मेडीकलमध्ये बसलो होतो. अंदाजे ७:१५ वाजता रणजित दवाखान्यात राऊंड घेण्यासाठी त्याच्या केबीनमधून गेला होता. त्यावेळी अंजूम मुलाणी याला रणजितच्या केबीनमध्ये कुणीतरी आल्याची चाहुल लागल्याबाबत मला सांगितले होते. त्यानंतर मी, अंजुम मुलाणी व अवधुत शेटे असे मिळून रणजितच्या हॉस्पीटलमधील केबीनच्या दिशेने गेलो होतो. त्यावेळी एक इसम

केबीनमधून बाहेर येताना आम्हाला दिसला. त्यावेळी त्याच्या हातात एक स्क्रू ड्रायव्हर व हात रुमाल होता. हातरुमालाला गाठ मारलेली होती. त्यावेळी त्याला आम्ही थांबवून "काय करत होता?" असे विचारले होते. त्यावेळी तो काही बोलला नाही. त्यानंतर आम्ही केबीनमध्ये जावून ड्रॉवर चेक केला असता ड्रॉवरचे लॉक तुटलेल्या अवस्थेत होते, ड्रॉवर उघडे होते, काही पैसे खाली पडलेले होते व काही पैसे हातरुमालात त्या इसमाने बांधले होते. त्यावेळी त्याला "तुझ्याबरोबर दुसरा कोणी आहे का?" असे विचारले असता त्याने होकारार्थी उत्तर देवून त्याचेसोबत असलेला इसम बाहेर दुचाकीवर असल्याचे सांगितले. त्यावेळी सदर इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव रोहित बाजीराव आकळे, रा. केदारवाडी असे सांगितले होते. तसेच बाहेर दुचाकीवर असलेल्या इसमाचे नाव महादेव सखाराम माने, रा. विठ्ठलवाडी असे असल्याचे रोहित आकळे यांनी सांगितले होते. रोहीत आकळे यांनी बाहेर दुचाकीवर असलेल्या इसमाचे नाव अगोदर संतोष माने रा. विठ्ठलवाडी असल्याचे सांगितले होते. बाहेर असलेला इसम दुचाकीवरुन पळून गेला. दवाखान्यातून घटनेच्या वेळी रुपये ३०२०/– चोरीस गेले होते. चोरी गेलेल्या रक्कमेपैकी काही नोटा ५००/– रुपयाच्या व काही नोटा १००/– च्या व १०/– च्या होत्या.

३. त्यानंतर मी इस्लामपूर पोलिस ठाण्यात फोन केला होता. त्यानंतर पोलिस आले होते. पोलिसांनी रोहित आकळे याला ताब्यात घेतले होते. पोलिसांनी रोहित आकळेकडे चौकशी केली असता त्याने चोरी केल्याचे मान्य केले. घटनेबाबत मी इस्लामपूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. चोरी गेलेली रक्कम आम्हाला अद्याप परत मिळाली नाही. स्क्रू ड्रायव्हर व रक्कम दाखविल्यास मी ओळखू शकतो. आरोपींस पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज न्यायदालनात हजर नाहीत. (आरोपींचे विधीज्ञांनी आरोपींचे ओळखीबाबत वाद उपस्थित करणार नसल्याचे प्रतिपादन करुन त्यांचे गैरहजेरीत खटला चालविण्याबाबत परवागनी मिळणेकरीता अर्ज **निशाणी ६०** दाखल केला असून तो मंजूर करण्यात आला.) आता मला फिर्याद दाखविली, ती तीच असून त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **निशाणी ६२** देण्यात येते). आता मला एफ. आय. आर दाखविली, ती तीच असून त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **निशाणी ६३** देण्यात येते).

४.		घटनेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी १०:३० वाजता पोलिस हॉस्पीटलमध्ये आले होते.  पोलिसांना घटनास्थळ मी दाखविले होते. त्याठिकाणी पोलिसांनी पंचनामा केला.  आता मला रोहित आकळे याचे हातातील स्क्रू ड्रायव्हर दाखविला, तो तोच आहे, (त्यास **आर्टीकल 'अ'** देण्यात येते).

**<u>उलटतपासणी आरोपीतर्फे श्री. एस. एम. नवाळे विधीज्ञ.</u>**

५.	आमच्या दवाखान्याची वेळ सकाळी ११:०० ते रात्री ८:०० पर्यंत आहे. दिवसभरामध्ये साधारण ४० ते ५० पेशंट्स येतात. सकाळी ११:०० ते रात्री ८:०० पर्यंत आमच्या दवाखान्यात वर्दळ असते. घटनेच्या दिवशी रणजितच्या केबीनमधील ड्रॉवरमध्ये किती नाणी व किती चलनी नोटा होत्या हे मला सांगता येत नाही. तसेच ड्रॉवरमध्ये असलेल्या नोटांचे नंबर मला सांगता येत नाहीत. रोहित आकळे याने ड्रॉवर स्क्रू ड्रायव्हरने काढताना मी प्रत्यक्ष पाहिलेले नाही. मी, अंजुम मुलानी व अवधुत शेटे मेडिकलमध्ये बसल्याचे खोटे सांगत आहे, हे म्हणणे खोटे आहे. हातरुमालामध्ये बांधलेली रक्कम ड्रॉवरमधील होती अगर कसे, हे मला सांगता येत नाही. सरतपासणी दरम्यान घटनेबाबत मी जे काही सांगितले आहे ते खोटे आहे, हे म्हणणे खोटे आहे.

६.		आमच्या दवाखान्यापासून इस्लामपूर पोलिस ठाण्यात दुचाकीने जाण्यासाठी १० मिनिटे लागतात. माझ्याकडे स्वतःची दुचाकी आहे. मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही, हे म्हणणे खोटे आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.02.23 18:56:58 +0530

**इस्लामपूर.** **(भगवान म. कारलेकर)**

**दिनांकः- २३/०२/२०२६** **अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, इस्लामपूर.**